## केंद्रीय उत्पाद तथा सिमा शुल्क खात्याचे श्री. एम.टी. चव्हाण यांची अखील भारतीय मैदानी स्पर्धे करीता निवड.



केंद्रीय राजस्व क्रिडा मंडळाव्दारा दि.१४ आणि १५ जानेवारी २०१४ रोजी नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या पश्चीम विभागीय क्रिडा स्पर्धेत सहभागी झालेल्या औरंगाबाद येथील कार्यालयाचे श्री. एम.टी. चव्हाण यांनी पाच किलोमीटर चालणे या क्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक आणि १५०० मीटर धावण्याचा शर्यतीत सुवर्ण पदक पटकविले आहे. श्री.एम.टी. चव्हाण यांची दि.१९,२० आणि २१ फेब्रुवारी २०१४ रोजी चंदीगड येथे होणाऱ्या अखिल भारतीय क्रिडा स्पर्धे करीता निवड झाली आहे. त्यांच्या यशाबद्दल केंद्रीय उत्पाद तथा सिमा शुल्क कार्यालय औरंगाबादतर्फे श्री. कुमार संतोष आयुक्त, श्री. एस.पी. मिश्रा अतिरिक्त आयुक्त, श्री. दिनेश पांगरकर अतिरिक्त आयुक्त आणि किशन कुदमुलवार अधिक्षक तथा क्रिडा अधिकारी आणि समस्त कर्मचारी यांनी श्री.एम.टी. चव्हाण यांचे अभिनंदन केले.

श्री. एम.टी. चव्हाण हे सातत्याने सन १९८४ पासुन अखिल भारतीय केंद्रीय राजस्व क्रिडा स्पर्धेत भाग घेऊन पदक मिळवीत आहेत. त्यांचे हे यश या कार्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. असे श्री. कुमार संतोष यांनी सांगीतले. पुढील काळातही श्री. चव्हाण यांना राष्ट्रीय स्पर्धेत घवघवीत यश प्राप्त व्हावे अशी इच्छा व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या.